पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे ४११ ०१८
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/२/कावि/३७/२०२५
दिनांक -१३/१२/२०२५

**विषय : जनसंवाद सभेचे कामकाजाबाबत...**

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, कार्यक्षेत्रातील सन्माननीय नागरिक आणि प्रशासन यांच्यामध्ये सुसंवाद राखण्यासाठी, तक्रारींचे निवारण जलदगतीने करण्यासाठी आणि प्रशासकीय निर्णयांमध्ये तसेच होणा-या विकास कामांमध्ये सन्माननीय नागरिकांच्या आशा आकांक्षांचे प्रतिबिंब उमटणे गरजेचे असल्याने क्षेत्रीय कार्यालय निहाय दुस-या व चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्याबाबत दिनांक १७ नोव्हेंबर, २०२२ रोजी आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे.

तथापि जनसंवाद सभेत येणा-या तक्रारी, नागरिकांची संख्या जास्त प्रमाणात आहे. वादविवादाचे/ प्रसंग टाळण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका, सर्व क्षेत्रीय कार्यालयाकरीता प्रस्तुत परिपत्रकाव्दारे खालीलप्रमाणे उपाय योजना / नियमावलीबाबत सूचना देण्यात येत आहे.

**१) जनसंवाद सभेसाठी आलेल्या सर्व नागरिकांची बसण्याची व्यवस्था प्रतिक्षा कक्षामध्ये करण्यात यावी.**
**२) जनसंवाद सभेसाठी आलेल्या नागरिकांना तक्रारी नमुद करणेसाठी अर्जाचा नमुना देणे व अर्ज भरून घेण्यात यावा.**
**३) जनसंवाद सभागृहामध्ये आलेल्या नागरिक / तक्रारदार यांना एकेकाला बोलवण्याऐवजी सर्व तक्रारदारांना एकाचवेळी तक्रारीचे स्वरुप विशद करण्यासाठी प्रवेश देण्यात यावा.**
**४) प्रत्येक व्यक्तीसाठी वेळ मर्यादा निश्चित करण्यात येत असून एका नागरिकांची तक्रार समजून घेतल्यानंतरच दुसरी तक्रार घेण्यात यावी.**
**५) अधिकारी/कर्मचारी यांनी जनसंवाद सभागृहामध्ये सुनिश्चित केलेल्या वेळेवर उपस्थित राहण्याची दक्षता घ्यावी.**
**६) जनसंवाद सभागृहामध्ये आलेल्या नागरिक/तक्रारदार यांचे नाव गोपनिय राहील याची दक्षता घेण्यात यावी.**
**७) जनसंवाद सभेचे व्हिडिओ चित्रीकरण करता येणार नाही.**
**८) जनसंवाद सभेच्या वेळेत दोन सुरक्षा रक्षक MSF कर्मचारी (एक महिला व एक पुरुष) यांची नेमणूक करण्यात यावी.**
**९) जनसंवाद चालु असतांना पत्रकार माहितीसाठी येत असतील तर याबाबत जनसंवाद सभा संपल्यावर मुख्य समन्वय अधिकारी यांच्या मार्फत सभा संपल्यावर पत्रकारांना माहिती देण्यात यावी.**
**१०) जनसंवाद सभेत झालेल्या चर्चेचा अहवाल तयार करावा, या अहवालात चर्चेतील महत्वाचे मुद्दे, नागरिकांचे प्रश्न, प्रशासनाची उत्तरे आणि भविष्यातील योजना नोंदवाव्यात. तसेच नागरिकांनी दिलेल्या सुचना आणि तक्रारीचे निराकरण करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी.**
**११) जनसंवाद सभा झाल्यानंतर नागरिकांचा प्रतिसाद / अभिप्राय घेऊन भविष्यातील सुधारणाबाबत आढावा घ्यावा.**

महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयातील जनसंवाद सभेकरिता नियुक्त मुख्य समन्वय / समन्वय अधिकारी यांनी प्रस्तुतचे परिपत्रक संबंधित नागरिकांच्या निदर्शनास आणून देवून उपरोक्त सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत दक्षता घ्यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति,
सर्व संबंधित विभाग,
सर्व विभागप्रमुख/अधिकारी/कर्मचारी